**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ६७/२०२६.</u>**
**<u>ज्ञानोबा विठ्ठल मुळे वि. निरंक</u>**
**<u>CNR No : MHBI130002692026.</u>**

**<u>:: निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश ::</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार यांचे चुलते नामे **गंगाराम पि. कानु मुळे** हे अविवाहित असताना दिनांक ०६/०४/२०११ रोजी मयत झाले आहेत. मयत **गंगाराम पि. कानु मुळे** यांचे आई-वडिल व अर्जदार यांचे आज्जी-आजोबा हे दोघेही ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. मयत **गंगाराम पि. कानु मुळे** यांना अर्जदार हा पुतन्या या नात्याने एकमेव कायदेशीर वारस आहे. मयतास अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. अर्जदाराला विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**०३.** प्रकरणात आदेश पारीत करून दिनांक ०४/०२/२०२६ रोजीचे दैनिक **"महाराष्ट्र प्रतिमा"** या वर्तमानपत्रात सदर प्रकरणाबाबत जनतेस जाहीर नोटीस बजाविण्यात आले. त्या वर्तमानपत्राची आवृत्ती नि. ०८ वर अभिलेखावर दाखल आहे.

**०४.** अर्जदार **ज्ञानोबा विठ्ठल मुळे** यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र. ०९ प्रमाणे अभिलेखावर दाखल केला आहे. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ साक्षीदार क्र २ वचिष्ठ अनिरुद्र कदम याचा नि. क्र १५ वर पुरावा दिला. नि क्र १३ वर विठ्ठल कानुबा मुळे याचे मयत प्रमाणपत्र व वनारसी विठ्ठल मुळे हिचे नि. क्र १४ वर मयत प्रमाणपत्र दिले. अर्जदारांची पुरावा संपल्याची पुरसीस निशाणी क्र. १० व १६ वर आहे. अर्जदार हेच मयत **गंगाराम पि. कानु मुळे** यांचे कायदेशिर वारस आहेत.

अर्जदाराने मृतक **गंगाराम पि. कानु मुळे** यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र. ०५ वर, कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र नि.क्र. ०६ वर व अर्जदार यांचे आधार कार्ड प्रत अभिलेखावर दाखल केली आहे.

**०५.** जनतेस जाहीर नोटीस देवुन सुध्दा आजपावेतो वारसप्रमाणपत्र देण्याबाबत कोणतेच आक्षेप न्यायालयास प्राप्त झाले नाही. म्हणुन अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून अर्जदार हेच मृतकाचे वारस असल्याचे दिसुन येते. म्हणुन खालील आदेश पारीत.

**:: आदेश ::**

**०१.** अर्ज मंजुर.

**०२.** न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ मधील अपेन्डीक्स-बी प्रमाणे **अर्जदार ज्ञानोबा पि. विठ्ठल मुळे** यांना मयत **गंगाराम पि. कानु मुळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

**०३.** बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये दिल्या जाणा-या प्रमाणपत्रासोबत दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ मध्ये दिलेल्या सुचना जोडाव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DIPAK RUSTUMRAO BORDE
Date: 2026.05.05 11:28:58 +0530

दिनांक – ०५/०५/२०२६.
ठिकाण - परळी वैजनाथ.

**( दिपक रु. बोर्डे )**
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)
परळी वैजनाथ